# फळसेवाडी हितकारी संस्था
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 25 फेब्रुवारी 2007
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 10. श्री दिलिप मधुकर राणे |
| 2. श्री मंगेश मनोहर राणे | 11. श्री विनोद विठोबा राणे |
| 3. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 12. श्री सुरेश दत्ताराम राणे |
| 4. श्री सुरेश रघुनाथ राणे | 13. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 5. श्री प्रविण प्रताप राणे | 14. श्री उदय भगवान राणे |
| 6. श्री उत्तम वामन राणे | 15. श्री गुरुनाथ गणपत राणे |
| 7. श्री अशोक दत्ताराम राणे | 16. श्री भरत गणपत राणे |
| 8. श्री मंगेश यशवंत सावंत | 17. श्री सत्यवान गणपत सावंत |
| 9. श्री शंकर बाळकृष्ण राणे | |

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 25 फेब्रुवारी 2007 रोजी शिरोडकर हायस्कुल, परेल मुंबई 400 012 येथे संपन्न झाली. या सभेस एकूण 17 सभासद उपस्थित होते. सभेमध्ये खालील विषयांवर चर्चा झाली.

1. मागिल इतिवृत्त दिनांक 05 मार्च 2006 चे वाचून मंजूर करणे
2. वाडीतील सुख-सुविधा निर्माण करणेबाबत चर्चा करून निर्णय घेणे
3. जमा-खर्च, वार्षिक वर्गणी संबधी विचारणा करणे
4. रोजगार संबधी चर्चा करणे
5. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय

संस्थेचे अध्यक्ष स्थानापन्न झाल्यानंतर जेष्ठ नागरिक श्री मधुसुदन श्रीधर राणे यांनाही अध्यक्षांच्या आसनाजवळ बसविण्यात आले व सभेच्या कामकाजास सुरवात झाली. या सभेचे विषय सुरु करण्यापूर्वी अध्यक्षांच्या वतिने चिटणीस यांनी वाडीतील स्वर्गवासी झालेल्या व्यक्तीना श्रध्दांजली वाहण्यात आली. संस्थेचे माजी उपाध्यक्ष कै. मधुकर स. राणे व कै. भगिरथी हरिश्चंद्र राणे यांना दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. चिटणीस श्री सुनिल सदानंद राणे यांनी कै, मधुकर स. राणे यांच्या कार्याबद्दल गौरवापर श्रध्दांजली वाहिली.

विषय क्रमांक 1 नुसार संस्थेच्या दिनांक 05 मार्च 2006 रोजी पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करण्यात आले व या इतिवृत्तास मंजूरी देण्यात आली.

विषय क्रमांक 2 : वाडीतील सुख-सुविधा निर्माण करणेबाबत. या बाबतीत विशेषत: दोन विषयांवर मुख्यतो चर्चा झाली

**<u>वाडीतील पाउलवाटा व रिक्शा रस्ता</u>** – या विषयासंबधी संस्थेचे अध्यक्ष मंगेश मनोहर राणे यांनी वाडीतील या जोडरस्त्याबद्दल माहीती दिली व त्यांनी केलेल्या पाऊलवाटांची मोजमापे, परिमाणे व कच्या रस्त्याचा आराखडा सभाग्रहास सादर केला व या रस्त्यामध्ये येणारे जमिनदार यांची नावे सांगितली. त्यानुसार सर्व बाजूनी चर्चा होऊन हा रस्ता तयार करण्यासाठी रु.100/- चे बॉन्डपेपरवर 'ना हरकत' प्रमाणपत्र घेण्याचे ठरले. हे 'ना हरकत' प्रमाणपत्र मिळाल्यानंतर मा. नामदार नारायणरावजी राणे यांचेकडे हे रितसर पत्र देण्याचे ठरले जेणेकरून हे काम लवकरात-लवकर पूर्ण करण्याचे ठरले.

वाडीतील रस्ता बनविण्यासाठी खालील ग्रामस्थांचे 'ना हरकत' प्रमाणपत्र घेण्याचे ठरले.
(1) श्री शंकर बाळकृष्ण राणे (2) श्री पांडूरंग सावजी राणे (3) श्री आनंद नारायण साटम
(4) श्री अरुण वासुदेव राणे (5) श्री दत्ताराम विष्णु साटम (6) श्री सुरेश रघुनाथ राणे
(7) श्रीमती सत्यवती भगवान सावंत (8) श्रीमती वासंती दिनकर राणे (9) श्री नाना राजाराम राणे
(10) श्री जयवंत नाना राणे (11) श्री साबाजी त्रिंबक राणे (12) श्री विठोबा साबाजी साटम
(13) श्री तुकाराम विनायक राणे

**<u>ब्राह्मण विहीर दुरुस्ती</u>** – या संर्दभात श्री सुरेश रघुनाथ राणे यांनी सुचविल्याप्रमाणे या विहीरीच्या जमीनीचे मालक श्री नाना राजाराम राणे यांचेकडून रु.100/- या बॉन्डपेपरवर 'ना हरकत' प्रमाणपत्र मिळवून जिल्हा परिषदेस सादर केल्यास या विहीरीची दुरुस्ती / पुर्नःबांधणी होऊ शकते या विषयासंबधी सर्व काम-काज पाहण्याचे अधिकार श्री सुरेश रघुनाथ राणे यांना दिले व हे काम त्यांनी पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले.

**<u>फळसेवाडी शाळा क्रमांक 2</u>** – या संर्दभात चर्चा.
या संबधात फळसेवाडी शाळा क्रमांक 2 निर्मिती संबधात एक विनंतीपत्र मा नामदार नारायणराव राणे यांना पाठविण्याचे ठरले. तसेच 15 मार्च नंतर या विषयी चर्चा करण्याचे ठरले. तसेच सौ दिपा राणे यांना हे काम मा. नारायणराव राणे यांनी सोपविले आहे त्यांच्याशी संर्पक करण्याचे ठरले. तसेच वाडीतील सर्व सुविधांबद्दल मा नामदार नारायणराव राणे यांच्याशी चर्चा करण्यासाठी जेष्ठ नागरिक यांचे शिष्ठमंडळ नेण्याचे ठरले. या संबधी राणेसाहेब यांच्या भेटीच्या निश्चितीसाठी श्री प्रविण प्रताप राणे यांना जबाबदारी दिली.

**<u>रोजगार योजना</u>** – वाडीतील सुशिक्षित तरुण मुला-मुलींना नोकरी देण्यासाठी सर्व उमेदवारांचे वैयक्तिक माहीती पत्रक संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचेकडे द्यावेत असे ठरले. हे अर्ज 10 मार्च पर्यंत द्यावेत असे ठरले.

**<u>संस्थेचा जमाखर्च व वर्गणी</u>** – या विषयांवर बरीच चर्चा झाली. या चर्चेत बहुतेक सर्व सभासदांनी भाग घेतला. संस्थेचे उपखजिनदार श्री उदय भगवान राणे यांनी सांगितले की संस्थेच्या पटावर आज 70 मेंबर आहेत अजून काही नवीन सभासद होऊ शकतात. तरी आपण मागील थकबाकीवर भर न देता रु.1001/- तहहयात मेंबरशिप घ्यावी जेणेकरून वर्गणी दरवर्षी घेण्याचा वेळ वाचेल. तसेच मागील वर्गणी भरपूर बाकी आहे त्यासाठी संस्थेच्या अध्यक्षांनी असे सुचविले की आपण स्वत: व श्री उदय भगवान राणे यांची मदत घेऊन वैयक्तिक पत्र तयार करून कुटूंबप्रमुखांना देण्यात येईल व ही वर्गणी दिनांक 31 मार्च 2007 पर्यंत देण्याची विनंती करण्यात येईल. त्यानंतर ही वर्गणीची थकबाकी वसुल झाल्यास श्री उदय भगवान राणे यांनी मांडलेल्या रु.1001/- भरून तहहयात मेंबरशिप याचा विचार करण्यात येईल.

या चर्चेमध्ये भाग घेताना श्री गुरुनाथ गणपत राणे यांनी असे सुचविले की वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थिती वाढविण्यासाठी संस्थेची मिटिंग शनिवारी घेऊन पाहावी जेणेकरून कामावर असलेले सभासदही घरी जातांना सभेस उपस्थित राहतील. काही दुरचे सभासद रविवारी खास सभेसाठी येण्याचे टाळतात तरी या गोष्टीचा विचार करावा. अध्यक्षांनी या सुचनेस पाठिंबा दिला व पुढील एक सभा जी जुलै / ऑगष्ट मध्ये होईल ती शनिवारी घेण्याचे ठरले.

**<u>अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय</u>** – या विषयांमध्ये चिटणीसांनी दोन विषय मांडले जे कार्यकारिणी सभेमध्ये चर्चिले गेले.
मा. नितेश राणे, सेक्रेटरी, इंडियन काँग्रेस यांची सदिच्छा भेट व छोटासा सत्कार या बाबतीत चिटणीसांनी सभाग्रहास सांगितले 'मा नितेश राणे' (मा नारायणराव राणे यांचे चिरंजीव) सध्या युवक काँगेसच्या चिटणीसपदी निवडून आले असून त्यांचा सत्कार सदिच्छा भेट श्री प्रविण प्रताप राणे यांच्या सहाय्याने घेण्याचे ठरले आहे. या बाबतीत श्री प्रवीण राणे यांनी सांगितले कि हि भेट आपण 15 मार्च 2007 नंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीनंतर आयोजित करुन संस्थेस त्याबद्दल कल्पना देईन.

10 एप्रिल 2007 रोजी मा नारायणराव राणे यांचा वाढदिवस दरवर्षी साजरा होत असतो. संस्थेचे सभासद त्यांना भेटून शुभेच्छा देतात. यावेळी आपण भेट घ्यावयाची आहे. त्यावेळी वेळ व ठिकाण निश्चित करायची व सभासदांना आमंत्रण दयायचे आहे. यासाठी एक उपकमिटी बनविण्यात आली. या भेटीची वेळ व ठिकाण हे निश्चित करण्यासाठी श्री प्रविण प्रताप राणे, श्री अशोक दत्ताराम राणे, श्री मंगेश मनोहर राणे यांनी कार्यरत राहावे हि विनंती करण्यात आली. त्यानुसार सभासदांना भेटीची वेळ कळविण्याचे ठरले.

विषय सुचिनुसार सर्व चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. वाडीतील सुख सुविधांसाठी सर्वांनी सहकार्य देण्याचे ठरले. त्यानंतर अध्यक्षांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानले. तसेच या सभेस जेष्ठत्व या नात्याने सहकार्य केल्याबद्दल श्री मधुसुदन श्रीधर राणे, श्री सुरेश रघुनाथ राणे, श्री सचिन झिलू राणे आणि श्रीमती दिपा राणे यांचेहि आभार मानन्यात आले.

तसेच रु.750/- सत्कार फोटोचे देण्याचे ठरले व नवीन सभासद लिस्ट बनविण्याचे ठरले.

शेवटी चहापाण्याचा कार्यक्रम होऊन राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली.

---